# सार्थ
# श्रीमद्‌भगवद्‌गीता

कृ. ना. आठल्ये

ॐ पब्लिकेशन्स्

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**सार्थ श्रीमद्भगवद्गीता : Sarth Shrimadbhagwadgeeta**
कृ. ना. आठल्ये

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान हॉस्पिटल समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९६८ ९९९५ ३००

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
फेब्रुवारी, २०१३

**किंमत**
रुपये १३०/-

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ○ श्रीगीतामाहात्म्यम् | .................... | ७ |
| ○ अथ श्रीमद्भगवद्गीताध्यानादि | .................... | ११ |
| ○ अध्याय पहिला- अर्जुन-विषादयोग: | .................... | १७ |
| ○ अध्याय दुसरा- सांख्ययोग | .................... | २९ |
| ○ अध्याय तिसरा- कर्मयोग | .................... | ४८ |
| ○ अध्याय चवथा- ज्ञानकर्मसंन्यास योग | .................... | ५९ |
| ○ अध्याय पाचवा- संन्यास योग | .................... | ७० |
| ○ अध्याय सहावा- आत्मसंयमयोग | .................... | ७८ |
| ○ अध्याय सातवा- ज्ञानविज्ञानयोग | .................... | ९० |
| ○ अध्याय आठवा- अक्षरब्रह्मयोग | .................... | ९८ |
| ○ अध्याय नववा- राजविद्या राजगुह्ययोग | .................... | १०६ |
| ○ अध्याय दहावा- विभूतियोग | .................... | ११५ |
| ○ अध्याय अकरावा- विश्वरूपदर्शन | .................... | १२५ |
| ○ अध्याय बारावा- भक्तियोग | .................... | १४१ |
| ○ अध्याय तेरावा- क्षेत्रक्षेत्रज्ञेविभागयोग | .................... | १४७ |
| ○ अध्याय चौदावा- गुणत्रयविभागयोग | .................... | १५६ |
| ○ अध्याय पंधरावा- पुरुषोत्तमयोग | .................... | १६३ |
| ○ अध्याय सोळावा- दैवासुरसंपद्विभाग | .................... | १६९ |
| ○ अध्याय सतरावा- श्रद्धात्रयविभागयोग | .................... | १७६ |
| ○ अध्याय अठरावा- मोक्षसंन्यासयोग | .................... | १८४ |
| ○ गीतामाहात्म्य | .................... | २०३ |
| ○ श्रीमद्भगवद्गीता- अनुष्ठान | .................... | २०५ |
| ○ मंत्र | .................... | २०५ |


✦✦

# ।। श्रीगीतामाहात्म्यम् ।।

**श्री गणेशाय नमः ।। श्रीराधारमणाय नमः ।।**

**धरोवाच–**

**भगवन्परमेशान भक्तिरव्यभिचारिणी।**
**प्रारब्धं भुज्यमानस्य कथं भवति हे प्रभो ।। १ ।।**

पृथ्वीदेवीने विचारले – भगवंता, परमेश्वरा ! नशिबाचे भोग भोगीत असलेल्या मनुष्यांना तुझी अनन्य भक्ती कशाने उत्पन्न होईल? १.

**विष्णुरुवाच–**

**प्रारब्धं भुज्यमानो हि गीताभ्यासरतः सदा ।**
**स मुक्तः स सुखी लोके कर्मणा नोपलिप्यते।। २।।**

श्रीविष्णु म्हणाले – नशिबाचे भोग भोगीत असताही जो सदोदित गीतेच्या अभ्यासात मग्न असतो तो संसारात असूनही मुक्त व सुखी होतो. कर्मानि तो लिप्त होत नाही. २.

**महापापादिपापानि गीताध्यानं करोति चेत्।**
**क्वचित्स्पर्शं न कुर्वंति नलिनीदलमंबुवत् ।। ३।।**

कमलपत्रास पाण्याचा लेप लागत नाही, तसेच गीतेत सांगितलेल्या ज्ञानाचा अभ्यास करणाऱ्याला पंचमहापातकादि पापे स्पर्श करीत नाहीत. ३.

**गीतायाः पुस्तकं यत्र यत्र पाठः प्रवर्तते।**
**तत्र सर्वाणि तीर्थानि प्रयागादीनि तत्र वै ।। ४।।**

जिथे गीतेचे पुस्तक असते व गीतेचा पाठ चालतो, तिथे प्रयागराजादि सर्व तीर्थे वास करतात. ४.

**सर्वे देवाश्च ऋषयो योगिनः पन्नगाश्च ये ।**
**गोपाला गोपिका वापि नारदोद्धवपार्षदैः**
**सहायो जायते शीघ्रं यत्र गीता प्रवर्तते ।। ५ ।।**

जिकडे गीतेचा अभ्यास चालतो, तिकडे सर्व देव, ऋषी, योगी, सर्पराज, गोपाल, गोपी, नारद, उद्धव व इतर पार्षद गणासहवर्तमान भगवान उपस्थित राहून मदतनीस होतात. ५.

**यत्र गीताविचारश्च पठनं पाठनं श्रुतम् ।**
**तत्राहं निश्चितं पृथ्वि निवसामि सदैव हि ।। ६ ।।**

जिकडे गीतेचा विचार, गीतेचे अध्ययन, अध्यापन व श्रवण चालते, तेथे हे पृथ्वी! मी निश्चयाने निरंतर राहतो. ६.

**गीताश्रयेऽहं तिष्ठामि गीता मे चोत्तमं गृहम् ।**
**गीताज्ञानमुपाश्रित्य त्रींल्लोकान्पालयाम्यहम् ।। ७ ।।**

मी गीतेच्या आश्रयाने राहतो. गीता हेच माझे उत्तम घर आहे. गीतेच्या ज्ञानाचा आधार घेऊनच मी त्रैलोक्याचे पालन करतो. ७.

**गीता मे परमा विद्या ब्रह्मरूपा न संशयः ।**
**अर्धमात्राक्षरा नित्या स्वानिर्वाच्यपदात्मिका ।। ८ ।।**

गीता ही माझी सर्वात श्रेष्ठ ब्रह्मरूपिणी विद्या होय. ती अविनाशी अर्धमात्रारूपिणी असून, नित्य व अनिर्वाच्यपदात्मिका आहे. ८.

**चिदानंदेन कृष्णेन प्रोक्ता स्वमुखतोऽर्जुनम् ।**
**वेदत्रयी परानंदा तत्त्वार्थज्ञानसंयुता ।। ९ ।।**

शिवाय चिदानंदस्वरूप श्रीकृष्णाने ती अर्जुनाला स्वतः सांगितली आहे. ती ऋग्यजुःसामवेदरूपिणी, परमानंदस्वरूप व तत्त्वज्ञानार्थानें भरलेली आहे. ९.

**योऽष्टादशजपे नित्यं नरो निश्चलमानसः ।**
**ज्ञानसिद्धिं स लभते ततो याति परं पदम् ।। १० ।।**

जो मनुष्य शांत मनाने नियमित अठराही अध्याय म्हणतो, त्याला ज्ञानसिद्धीचा लाभ होऊन परमपद (श्रेष्ठ पद) प्राप्त होते. १०.

**पाठेऽसमर्थः संपूर्णे ततोऽर्धं पाठमाचरेत् ।**
**तदा गोदानजं पुण्यं लभते नात्र संशयः ।। ११ ।।**

दररोज जर संपूर्ण गीता म्हणणे अशक्य असेल तर अर्धी म्हणावी. त्यायोगे गोदानाचे पुण्य मिळेल यात संशय नाही. ११.

**त्रिभागं पठमानस्तु गंगास्नानफलं लभेत् ।**
**षडंशं जपमानस्तु सोमयागफलं लभेत् ।। १२ ।।**

अर्धी न म्हणता एक तृतीयांश म्हणजे सहा अध्याय रोज म्हटले असता गंगास्नानाचे फळ, आणि तीन अध्याय म्हटले असता सोमयागाचे फळ मिळेल.१२.

**एकाध्यायं तु यो नित्यं पठते भक्तिसंयुतः ।**
**रुद्रलोकमवाप्नोति गणो भूत्वा वसेच्चिरम् ।। १३।।**

भक्तिभावाने रोज एक अध्याय म्हणत राहिल्यास रुद्रलोकाची प्राप्ती होऊन तिथे तो रुद्राचा गण होत्साता वास करील. १३.

**अध्यायं श्लोकपादं वा नित्यं यः पठते नरः ।**
**स याति नरतां यावन् मन्वन्तरं वसुंधरे ।। १४ ।।**

एक अध्याय किंवा एक श्लोक, निदान श्लोकाचा एक चरण जरी नित्यनियमाने म्हणेल, तरी तो मन्वन्तरापर्यंत पृथ्वीवर मनुष्य होऊनच जन्मेल. १४.

**गीतायाः श्लोकदशकं सप्त पंच चतुष्टयम् ।**
**द्वौ त्रीनेकं तदर्धं वा श्लोकानां यः पठेन्नरः ।। १५ ।।**

गीतेच्या श्लोकापैकी दहा, सात, पाच, चार, तीन, दोन, एक अथवा अर्धाही श्लोक जो नित्य म्हणेल, १५.

**चंद्रलोकमवाप्नोति वर्षाणामयुतं ध्रुवम् ।**
**गीतापाठसमायुक्तो मृतो मानुषतां व्रजेत् ।। १६ ।।**

तो दहा हजार वर्षेपर्यंत चंद्रलोकात वास करील. गीतेचा पाठ म्हणत वा ऐकत असताना जो मरण पावेल त्याला मनुष्यजन्म मिळेल. १६.

**गीताभ्यासं पुनः कृत्वा लभते मुक्तिमुत्तमाम् ।**
**गीतेत्युच्चारसंयुक्तो म्रियमाणो गतिं लभेत् ।। १७ ।।**

आणि परत तो मनुष्य गीतेचा अभ्यास करून उत्तम मुक्ती मिळवेल. मरताना फक्त 'गीता' असा उच्चार करेल तरी तो चांगली गती प्राप्त करेल. १७.

**गीतार्थश्रवणासक्तो महापापयुतोऽपि वा।**
**वैकुंठं समवाप्नोति विष्णुना सह मोदते ।। १८।।**

गीतार्थ श्रवण करण्यात मग्न असलेला मनुष्य महापापी असला तरी वैकुण्ठाला जाऊन विष्णूच्या बरोबर आनंदभोग भोगेल. १८.

**गीतार्थं ध्यायते नित्यं कृत्वा कर्माणि भूरिशः ।**
**जीवन्मुक्तः स विज्ञेयो देहांते परमं पदम् ।। १९।।**

अनेक कर्मे करीत असता जो गीतार्थाशी सतत संबंध ठेवील, तो जीवन्मुक्त होऊन मरणोत्तर श्रेष्ठ पद मिळवेल. १९.

**गीतामाश्रित्य बहवो भूभुजो जनकादयः ।**
**निर्धूतकल्मषा लोके गीता याताः परं पदम् ।। २०।।**

गीताज्ञानाचा उपयोग करूनच जनकासारखे पुष्कळ राजर्षी पापरहित होऊन श्रेष्ठ पदाला पोचले अशी ख्याती आहे. २०.

**गीतायाः पठनं कृत्वा माहात्म्यं नैव यः पठेत् ।**
**वृथा पाठो भवेत्तस्य श्रम एव ह्युदाहृतः ।। २१।।**

गीतेचे वाचन करून तिचे हे माहात्म्य जो वाचणार नाही, त्याचा तो गीतापाठ व्यर्थ, तो केवळ श्रमच होय, असे जाणकारांचे म्हणणे आहे. २१.

**एतन्माहात्म्यसंयुक्तं गीताभ्यासं करोति यः ।**
**स तत्फलमवाप्नोति दुर्लभां गतिमाप्नुयात् ।। २२।।**

ह्या माहात्म्यासहित जो गीतेचा अभ्यास करतो, त्यास पूर्वोक्त फळ प्राप्त होऊन उत्तम गती प्राप्त होते. २२.

**सूत उवाच–**

**माहात्म्यमेतद्गीताया मया प्रोक्तं सनातनम् ।**
**गीतांते च पठेद्यस्तु यदुक्तं तत्फलं लभेत् ।। २३।।**

सूत म्हणतात – जो मनुष्य गीतापाठानंतर मी सांगितलेले गीतेचे हे सनातन माहात्म्य पठन करेल त्याला वरील फळ मिळेल. २३.

**।। इति श्रीवाराहपुराणे श्रीगीतामाहात्म्यं संपूर्णम् ।।**

# ।। अथ श्रीमद्भवद्गीताध्यानादि ।।

**।। श्री गणेशाय नमः ।। श्रीगोपालकृष्णाय नमः ।।**

**श्रीगणेशाय नमः ।। श्रीगोपालकृष्णाय नमः ।। ॐ अस्य श्रीमद्भगवद्गीतामालामंत्रस्य भगवान्वेदव्यास ऋषिः । अनुष्टुप् छंदः । श्रीकृष्णः परमात्मा देवता । अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे । इति बीजम् । सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज । इति शक्तिः । अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः । इति कीलकम् ।**

ॐ (परमब्रह्म वाचक शब्द) मंत्राचा कर्ता भगवान वेदव्यास ऋषि होत. हा मंत्र अनुष्टुप छंद आहे. ह्या मंत्राची देवता भगवान श्रीकृष्ण आहे. ''शोक करण्यास अयोग्य अशा संबंधी लोकांसाठी तू शोक करतोस व बाता तर मोठ्या पंडितासारख्या मारतोस!'' हे बीजतत्त्व-सारांश होय. ''सर्व धर्म सोडून तू मला एकट्यालाच शरण ये. ही शक्ति आहे. मी तुला सर्व पापातून मुक्त करेन, शोक करू नकोस.'' हे कीलक (किल्ली-मेढ) होय.

**न्यासाः**

**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।**

**इत्यंगुष्ठाभ्यां नमः ।।**

''ह्या आत्म्याला शस्त्राने कापता येत नाही, अग्नि ह्याला जाळू शकत नाही.'' म्हणून प्रत्येक हाताचा अंगठा व त्याच्याजवळील बोट एकमेकांना स्पर्शून व दोन्ही हात जुळवून नमस्कार करावा.

**न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुत: ।**

**इति तर्जनीभ्यां नम: ।।**

''पाणी ह्याला भिजवू शकत नाही व वायू ह्याला सुकवू शकत नाही.'' प्रत्येक हाताचा अंगठा व करंगळी एकमेकास स्पर्शून व दोन्ही हात जुळवून नमस्कार करावा.

**अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।**

**इति मध्यमाभ्यां नम: ।।**

''ह्याला तोडता येत नाही, जाळता येत नाही व भिजवताही येत नाही. तसेच ह्याला सुकविताही येत नाही.'' प्रत्येक हाताचा अंगठा मधल्या बोटास स्पर्शून, हात जुळवून नमस्कार करावा.

**नित्य: सर्वगत: स्थाणुरचलोऽयं सनातन: ।**

**इत्यनामिकाभ्यां नम: ।।**

''आत्मा हा नित्य, सर्वांमध्ये राहणारा, स्थिर असून सनातनही आहे.'' प्रत्येक हाताचा अंगठा अनामिकेस (अंगठीचे बोट) स्पर्शून दोन्ही हात जुळवून नमस्कार करावा.

**पश्य मे पार्थ रूपाणि शतऽशोथ सहस्रश: ।**

**इति कनिष्ठिकाभ्यां नम: ।।**

''हे पार्था, ही माझी हजारो, शेकडो रूपे पाहून घे.'' प्रत्येक हाताचा अंगठा करंगळीस स्पर्शून व दोन्ही हात जुळवून नमस्कार करावा.

**नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ।**

**इति करतलकरपृष्ठाभ्यां नम: ।।**

''ही रूपे अनेक प्रकारची, दिव्य, मनोहर तसेच नाना रंगांची व आकारांची आहेत.'' दोन्ही हातांच्या तळव्यावर आलटून पालटून पृष्ठभाग घासावा.

**अंगन्यासा:**

**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक: ।**

**इति हृदयाय नम: ।।**

हृदयाला नमस्कार असो. हृदयाच्या ठिकाणी स्पर्श करावा.

**न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुत:।**

**इति शिरसे स्वाहा ।।**

मस्तकाला स्पर्श करावा.

**नित्य: सर्वगत: स्थाणुरचलोयं सनातन:।**

**इति कवचाय हुम्।।**

हे कवच म्हणून बीजाक्षर 'हुम्'चा उच्चार करून डाव्या हाताने उजव्या हाताला व उजव्या हाताने डाव्या हाताला स्पर्श करावा.

**पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रश:।**

**इति नेत्रत्रयाय वौषट् ।।**

अंगठा व अनामिका ह्यांनी डोळ्याला स्पर्श करावा.

**नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनिच।**

**इति अस्त्राय फट्।।**

चुटकी वाजवून व हात मस्तकाच्या आजुबाजूला फिरवून डाव्या हातावर टाळी वाजवावी.

**श्रीकृष्णप्रीत्यर्थे पाठे विनियोग: ।।**

श्रीकृष्णाला प्रसन्न करण्यासाठी ह्याचा विनियोग करावा.

**अथ ध्यानम्**

**ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं**

**व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम्।**

**अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीं अष्टादशाध्यायिनीं**

**अंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ।। १ ।।**

अर्थ :- हे माते भगवद्गीते! भगवान नारायणांनी स्वत: अर्जुनाला उपदेश केलेली, प्राचीन मुनी व्यास यांनी महाभारतात ग्रथित केलेली, अद्वैतरूपी अमृताचा वर्षाव करणारी, संसाराचा द्वेष आणि उच्छेद करणारी व जिचे अध्याय अठरा आहेत, अशी जी पूज्य गीता, तिचे मी चिंतन व स्मरण करतो. १.

**नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे**

**फुल्लारविंदायतपत्रनेत्र।**